| MHKO110011552024 | नियमित दिवाणी दावा क्र. ८९/२०२४ मधील निशाणी क्रमांक २३ खाली आदेश<br>प्रमिला संभाजी कुंभार<br>विरुध्द<br>मारुती यशवंत कुंभर वगैरे |
|---|---|

प्रतिवादी क्र.१ ने प्रस्तुतचा अर्ज हा महत्वाची कागदपत्रे दाखल करण्यासाठी केलेला आहे. सदर अर्जावर वादीने निशाण क्र.२८ कडे जोरदार हरकत घेतलेली आहे.

२. प्रतिवादी क्र.१ चे असे कथन आहे की, न्यायालयाने मागणी केल्या प्रमाणे सिटी सर्वे क्र.७१ ते ७६ या जागेचे नकाशे दाखल करीत आहेत. त्यामुळे त्यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली. वादी तर्फे युक्तीवाद केला की, सदर कागदपत्रे हे वादीने उशिरा दाखल केलेले आहेत. म्हणून त्यांनी सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. वादी व प्रतिवादी तर्फे युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. वादीने सदर दावा हा कायम मनाई करीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ ने अर्ज नि.क्र. २३ सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचा विचार केला असता सदर कागदपत्रे दाखल करुन घेतल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर दावा हा कौफियत व म्हणणे दाखल करण्याकरीता प्रलंबित आहे. दोन्ही पक्षकारांना त्यांचा युक्तीवाद करण्याची संधी उपलब्ध आहे. म्हणून सदर अर्ज नामंजूर करणे संयुक्तीक वाटत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आ दे श

१. अर्ज अशंत:मंजूर करण्यात येतो.

२. सदर कामी कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

Sd/-

दिनांकः- १३/०६/२०२५.
पेठवडगाव

( आर. एस. मोरे )
३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पेठवडगाव